Lend A Hand India

# कृतीशील संवाद

शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ वर्ष ८ वे अंक ४ : सप्टेंबर २०२१

**नमस्कार,**

सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा. आपल्या आजुबाजूची परिस्थिती हळू हळू पुर्ववत होताना दिसते आहे. पुन्हा नव्याने नियमित जगणं सुरु होत आहे आणि ही आपल्या सर्वांसाठी नक्कीच आनंदाची गोष्ट आहे. कृतीशील संवाद मासिकाचा हा चौथा अंक तुमच्या समोर येतो आहे. खरं तर सलग नसलं तरी जवळपास आठ वर्षांपासून आपण कृतीशील संवादद्वारे आचार -विचार, माहिती, नवनिर्मिती आणि ज्ञानाची देवाण घेवाण करत आलो आहोत. या संपुर्ण काळात कृतीशील संवाद कधी प्रिंट स्वरुपात तर कधी बदलत्या कालानुरूप डिजीटल मॅगझिन (E-Magzine ) स्वरुपात तुमच्यापर्यंत आलेलं आहे. यापुढे जाऊन बदलते तंत्रज्ञान आणि संवादाची बदललेली माध्यमं लक्षात घेऊन कृतीशील संवाद अजून एका नव्या स्वरुपात तुमच्या पर्यंत येणार आहे. हे स्वरूप म्हणजेच कृतीशील संवाद मासिकाचे 'पॉडकास्ट' (Podcast ) व्हर्जन आहे. 'पॉडकास्ट' म्हणजे काय तर, आपला संपूर्ण कृतीशील संवाद हा अंक ऑडीओ स्वरुपात (आवाजाच्या माध्यमातून) विशिष्ट तंत्रज्ञानाचे सोपस्कर करून तुमच्यापर्यंत पोहचवणं. हे नवीन स्वरूप आपण दररोज रेडीओवर ऐकत असलेल्या कार्यक्रमांसारखे असेल. हे 'पॉडकास्ट' तुम्ही अगदी सहजपणे आपल्या मोबईलवर हवे तेव्हा ऐकू शकता तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांना सहजपणे पाठवू देखील शकता.

यासर्वांमध्ये आपले डिजीटल मॅगझिन (E-Magzine) नियमितपणे प्रकाशित होत राहील आणि त्या बरोबर 'पॉडकास्ट' देखील आपल्यापर्यंत येईल. अंक प्रकाशित होण्याची माध्यमं बदलती असली तरी अंकातील आशय मात्र गुणवत्तापूर्ण राहील यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आपण सर्वांनी जरूर या 'पॉडकास्ट'चा अनुभव घ्यावा, तो ऐकावा. 'पॉडकास्ट' ऐकुन आपल्या प्रतिक्रिया, सूचना आमच्या पर्यंत नक्की पोहचवा. या महिन्याचा कृतीशील संवाद पॉडकास्ट लवकरच प्रकाशित करून तुमच्यापर्यंत पोहचवला जाईल.

धन्यवाद,



सुनंदा माने
कार्यकारी संचालक,
लेंड अ हँड इंडिया.

## या अंकात वाचा ...


- **विशेष लेख:** 'मल्टी स्कील फौंडेशन कोर्स' चा विद्यार्थ्यांवरील प्रभाव: एक अभ्यास
- माजी मुख्याध्यापकांचे कौशल्य शिक्षणावरील अनुभव कथन
- **MSFC शाळावृत्त**
- एम.एस.एफ.सी. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम
- पंचक्रोशी विद्यालय अलुर आणि श्री निकेतन विद्यालय निपाणी या शाळांमध्ये वार्षिक मूल्यांकन परीक्षा
- **निदेशक विशेष लेख: गीतांजली पाटील**
- सहज, सोपे गणित अध्यापन प्रकल्प
- 'कारिगर' - कौशल्य प्रशिक्षण केंद्र: ओळख ऑटोमोबाईल लॅबची
- आगामी वार्ता
- लेंड अ हँड इंडिया अपडेट्स
- कारिगर प्रशिक्षण केंद्र अपडेट्स

# विशेष लेख : माजी मुख्याध्यापकांचे कौशल्य शिक्षणावरील अनुभव

Lend A Hand India

मी राजेंद्र पवार सेवानिवृत्त मुख्याध्यापक ,श्री काळभैरव विद्यालय, वर्णे ता. जि. सातारा. सध्या मी संबंधित शाळेत शालेय समितीचा चेअरमन म्हणून काम करत आहे. त्याचबरोबर कृषी विज्ञान केंद्र बोरगाव याठिकाणी शास्त्रीय सल्लागार समितीचा सदस्य म्हणून काम करत आहे. ब्लॉगच्या माध्यमातून दिनविशेष, चालू घडामोडी समाजापर्यंत नेण्याचा प्रयत्न करीत असतो. कौशल्य शिक्षणाची गरज, त्याचे महत्व आणि प्रत्यक्ष मला आलेला अनुभव आपणापुढे विशद करीत आहे.

जर आपण इतरांपेक्षा वेगळे काही केले तरच आपणास वेगळे काही मिळणार आहे. आतापर्यंत जे करत होतो तेच करत राहिलो तर वेगळे काही मिळण्याचा प्रश्नच येत नाही. वेगळे काही करावे या उद्देशाने नवीन गोष्टींचा मागोवा घेण्याचे आमचे काम चालूच होते. शाळेत कार्यानुभवांतर्गत व्यवसाय शिक्षण देण्याचा प्रयत्न चालू होता परंतु कृतीपत्रिका भरण्यापलीकडे मजल जात नव्हती. मुलांना प्रात्यक्षिक करायची संधी मिळाली तर त्या शिक्षणाचा व्यवहारात उपयोग होऊ शकतो. विद्यार्थ्यांचे जीवन निश्चितच बदलू शकते, आर्थिक स्थिती सुधारु शकते, इतकेच नव्हे तर रोजगार निर्मितीसुध्दा होऊ शकते याबाबत कसलाही संदेह नाही. आपणास काही व्यवसाय शिक्षणात वाटचाल करता येईल का हा विचार मनात घोळत असताना आमच्याच जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील कोल्हेश्वर विद्यालय,तांदुळवाडी येथे असा अभ्यासक्रम सुरू असल्याचे समजले. हा अभ्यासक्रम सुरु करण्यापाठीमागे प्रेरणा होती पर्यावरण तज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे यांची.

डॉ. शेंडे यांनी तांदुळवाडी शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक अरुण माने यांच्यासमोर ही व्यवसाय शिक्षणाची संकल्पना मांडली. इतकेच नव्हे तर पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील पाबळ या ठिकाणी डॉ. कलबाग यांनी सुरु केलेल्या विज्ञान आश्रम संकुलाला भेट दिली. विज्ञान आश्रम येथे छोटे छोटे अभ्यासक्रम शिकवले जातात, ज्याच्यामुळे रोजगार निर्मिती होते. अशा ठिकाणी भेट दिल्यामुळे व्यवसाय शिक्षण देणारी जिल्ह्यातील पहिली शाळा सुरु झाली. या शिक्षणाला खरा दुजोरा मिळाला तो लेंड अ हँड इंडिया या सामाजिक संस्थेमुळे. लेंड अ हँड इंडियाच्या कार्यकारी संचालक सुनंदा माने यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्यात व्यवसाय शिक्षण राबवण्याचा प्रयोग सुरू झाला. या अनुषंगाने सातारा जिल्ह्यात तांदुळवाडी येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीतच आमच्या विद्यालयात मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (Introduction to basic Technology ) हा विषय सुरु करण्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. सध्या हा विषय एमएसएफसी (Multi Skill Foundation Course ) या नावाने ओळखला जातो.

सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात हा अभ्यासक्रम इयत्ता ८ वी च्या वर्गासाठी आमच्या विद्यालयात सुरु करण्यात आला. नैसर्गिकरित्या ९ वी व १० वीला तो शिकवला गेला. मार्च २०१५ मध्ये या अभ्यासक्रमाची पहिली बॅच बाहेर पडली.

हा अभ्यासक्रम सुरु करायचा म्हटले तर राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण विभागाची परवानगी असणे आवश्यक असते. या दिव्यातून पार पडण्यासाठी लेंड अ हँड इंडिया (लाही ) ची सर्व तांत्रिक मदत झाली. हे सगळे करत असताना संस्थेची भूमिका अतिशय महत्वाची असते. दूरदृष्टीचे संस्थाचालक असतील तर कितीही मोठ्या समस्या असल्या तरी आपण त्यावर लीलया मात करु शकतो हे आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पवार यांनी दाखवून दिले. हा अभ्यासक्रम सुरु करायचा म्हटले तर संस्थेकडे पायाभूत सुविधा असाव्या लागतात, संस्थेची भक्कम आर्थिक स्थिती असावी लागते. ग्रामीण भागात शाळा चालवणे एक दिव्यच असते, तालुकास्तरावरील शाळा सोडल्यातर ग्रामीण भागातील शाळांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसते. आमची शाळाही त्याला काही अपवाद नव्हती, संस्थेकडे ठराविक बँक बॅलन्स असावा लागतो. आवश्यक असणारी सर्व रक्कम संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पवार यांनी स्वतः भरली. आवश्यक ते सर्व सोपस्कार पार करुन सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात पुणे विभागात फक्त तीन शाळांमध्ये हा व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी मिळाली. त्या तीन शाळांपैकी आमची एक शाळा होय.




**श्री. राजेंद्र पवार मा. मुख्याध्यापक ,श्री काळभैरव विद्यालय, वर्णे**

# पान क्रमांक दोन वरुन पुढे , मुख्याध्यापकांचे कौशल्य शिक्षणावरील अनुभव

हा अभ्यासक्रम आमच्या शाळेत सुरु होऊन सहा वर्षांचा कालावधी लोटला आहे. हा अभ्यासक्रम सुरळीत सुरु राहावा यासाठी लागणारी सर्व तांत्रिक तसेच आर्थिक मदत लेंड अ हँड इंडिया सामाजिक संस्थेकडून झाली. सध्याही ती होत आहे, यापुढेदेखील ग्रामीण भागातील शाळांना लाहीच्या मदतीची गरज भासणार आहे हे निश्चित.

आमच्या शाळेतील मल्टी स्कील अभ्यासक्रम योग्यरित्या राबवला जातोय की नाही यासाठी सातारा टीमचं योगदान खूप मोठे आहे. सातारा कार्यालयातील प्रकल्प समन्वयक मयूर लाड यांच्या कामकाजाचा उल्लेख याठिकाणी मला करावाच लागेल. या सरांची प्रत्येक महिन्याला शाळेला भेट असते. त्यांची भेट सगळयांना प्रोत्साहीत करणारी असते. हा माणूस मुळातच बहुआयामी आहे. त्यामुळे त्यांच्या भेटीविषयी मुलांना उत्सुकता असायची. मुलांना प्रोत्साहीत करणारे अनेक गुण त्यांच्याकडे आहेत.

मयूर लाड सरांनी निदेशकांच्या मदतीने गावात विभागवार बैठका घेतल्या आहेत. मल्टी स्कील विषयाचे महत्व लोकांना सांगितले आहे. काही बैठकांना मलाही उपस्थित राहता आले. यापुढे ग्रामपंचायतीचे सहकार्य घेऊन हा अभ्यासक्रम अधिक लोकाभिमुख करण्याचा आमचा मानस आहे. विद्यार्थ्यांना चांगले प्रात्यक्षिक करता यावे या उद्देशाने वर्कशॉपचे काम प्रगतीपथावर आहे. निधीची कमतरता असल्याने काम पूर्णत्वास नेण्यास विलंब होत आहे. थोड्याच दिवसात विद्यार्थ्यांना सुसज्ज वर्कशॉपमध्ये आपली प्रात्यक्षिके पूर्ण करता येतील यात शंका नाही.

सध्या या अभ्यासक्रमाचे दृश्य परिणाम दिसू लागले आहेत. बरेचसे विद्यार्थी एस. एस. सी. नंतर आय.टी.आय ला जात आहेत. १० वीच्या स्तरावर तंत्रशिक्षण हा विषय असल्याने अभ्यासक्रमास सहज प्रवेश मिळत आहे. माध्यमिक स्तरावर हा अभ्यासक्रम पूर्ण करणारास आय.टी. आय मध्ये २५% जागा आरक्षित आहेत. अभियांत्रिकी शिक्षणासाठी १५% जागा आरक्षित आहेत तर किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमासाठी ४०% जागा आरक्षित आहेत. स्वयंरोजगार करता येत आहे तो भाग पूर्ण वेगळा. सध्या अभियांत्रिकी महाविद्यालये ओस पडत आहेत तर धंदे शिक्षण (Business Management study ) अभ्यासक्रमास प्रवेश मिळत नाही. याला बाकीही काही कारणे आहेत. कोणत्याही उद्योगधंद्यात अभियंत्यांची पदे मर्यादित असतात. त्यामुळे आय.टी.आय. झालेल्या उमेदवारास सहज नोकरी, तुलनेने पगारही चांगला, याउलट स्थिती अभियंत्यांची आहे. स्वयंरोजगार करण्याकडेही विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शासन स्तरावर देखील त्यादृष्टीने प्रयत्न चालू आहेत. कौशल्य शिक्षणाला महत्व प्राप्त



व्हावे यासाठी सन २०१५ पासून १५ जुलै हा दिवस कौशल्य विकास दिवस म्हणून साजरा केला जावू लागला.

सन २०१५ लाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्किल इंडियाची घोषणा केली. या योजनेतून अनुभवी प्रशिक्षणार्थीला १० लाख तर नवोदित प्रशिक्षणार्थीला ५ लाख अर्थसाह्य उद्योग उभारणीसाठी मुद्रा बँकेमार्फत देण्याची तरतूद आहे. मेक इन इंडियाच्या धर्तीवर मेक इन महाराष्ट्र उद्योग व सेवा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील आहे. आता मुलींसाठी देखील आयटीआयमध्ये ३०% जागा राखीव आहेत. त्याचा मुलींनी जरुर फायदा घ्यावा असे वाटते.

कोणत्याही योजनेच्या फलनिष्पत्तीसाठी दशकाचा कालावधी जावा लागतो. आमच्या शाळेपुरता विचार करावयाचा म्हटले तर अनेक विद्यार्थ्यांनी आयटीआयचा अभ्यासक्रम पूर्ण करुन विविध उद्योगात नोकरीस प्राधान्य दिले आहे. काही विद्यार्थी स्वयंरोजगाराकडे वळले आहेत.

कौशल्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांत आत्मविश्वास येत आहे. सामान्य शिक्षणाने पोट भरता येईलच असे नाही पण विद्यार्थ्यांकडे कोणतेही कौशल्य असेल तर त्याला स्वतःचे जीवन जगण्यात अडचण नाहीच, उलट तो आपल्या कुटुंबाला पोसू शकतो. कौशल्य शिक्षण घेतलेल्या तरुणांची संख्या वाढली तर राज्य तसेच देश प्रगतीपथावर जाण्यास वेळ लागणार नाही.कौशल्य शिक्षण घेण्याची सुवर्ण संधी लेंड अ हँड इंडियाने उपलब्ध करुन दिली आहे त्या संधीचे आपण सोने करुया,स्वतः बरोबर देशाचीही प्रगती साधूया.

राजेंद्र पवार (मो.९८५०७८११७८)





## मल्टीस्कील अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये एम.एस.एफ.सी. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम २६ ऑगस्ट, २०२१ रोजी एस.एस.कोडाय हायस्कूल, कच्छ, गुजरात येथे उत्साहात पार पडला. सर्व विद्यार्थ्यांना एकत्र न बोलवता प्रत्येक दिवशी थोड्या विद्यार्थ्यांना शाळेत बोलावून कोविड सुरक्षिततेसंबंधी सर्व नियम पाळून हे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र स्वीकारताना विद्यार्थी खूप आनंदी दिसत होते. अशा प्रकारचा कौशल्य अभ्यासक्रम शालेय स्तरावर उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षकांसह लेंड अ हॅंड इंडिया संस्थेबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी कौशल्य अभ्यासक्रमामुळे त्यांना झालेल्या फायद्याबद्दल मत व्यक्त केले.

याप्रसंगी मुख्याध्यापकांनी आपल्या मनोगतात कौशल्य अभ्यासक्रमाची भविष्यातील गरज स्पष्ट करत लेंड अ हॅंड इंडिया संस्थेचे आभार मानले. या कौशल्य विषयाचा आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना फायदा झाल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, विद्यार्थी, शिक्षक, निदेशक यांच्यासह पालकवर्ग उपस्थित होता.




## पंचक्रोशी विद्यालय अलुर आणि श्री निकेतन विद्यालय निपाणी या शाळांमध्ये वार्षिक मूल्यांकन परीक्षा

विद्यार्थांचे वार्षिक मुल्यांकन शिक्षण प्रणाली मधील ही खूप महत्वूर्ण प्रक्रिया आहे. संपुर्ण वर्षभर विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेले ज्ञान, त्यांची प्रगती, कौशल्य शिक्षणाबाबतच त्याचं आकलन याबाबत मुल्यांकन करणे आवश्यक असते. या हेतूने लेंड अ हॅंड इंडियाच्या मार्गदर्शनाखाली पंचक्रोशी विद्यालय अलुर आणि श्री निकेतन विद्यालय निपाणी या शाळांमध्ये वार्षिक मूल्यांकन परीक्षा घेण्यात आली.

कारोनाजन्य परिस्थीमुळे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने हि परीक्षा घेण्यात आली. परीक्षा योग्य पद्धतीने होण्याच्या दृष्टीकोनातून लाही संस्थे मार्फत निदेशक वर्गाला परीक्षेचा हेतू, स्वरूप, त्याचे महत्व तसेच परीक्षा पद्धती या बाबींची सविस्तर माहिती देउन मार्गदर्शन करण्यात आले. त्यानूसार शाळेतील मुख्याध्यापक, समन्वयक आणि सर्व निदशकांनी योग्य प्रकारे नियोजन आणि पूर्वतयारी करून योग्य दक्षता घेऊन इयत्ता १० वीच्या एकूण ५० विद्यार्थांची MSFC विषयाची वार्षिक मूल्यांकन परीक्षा घेण्यात आली.



मुल्यांकन दरम्यान विद्यार्थी प्रात्यक्षिक करताना



# निदेशक विशेष : गीतांजली पाटील - एक यशस्वी लघुउद्योजिका

Lend A Hand India

कोल्हापूर जिल्ह्यातील हसूर खुर्द गावातील श्री. लक्ष्मी विद्यालय या शाळेत मागील १५ वर्षापासून व्यवसायाभिमुख शिक्षण शिकविले जाते. १३ वर्षापासून या शाळेतील निदेशिका, गीतांजली बाळासाहेब पाटील या एम.एस.एफ.सी. विभागात 'अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान' हा विषय शिकवतात. अन्नप्रक्रिया विभागात नवनवीन प्रक्रिया करून पदार्थाची निर्मिती करणे हे त्यांची आवड आहे.

आपल्या प्रवासाबद्दल सांगताना त्या म्हणाल्या कि, विद्यार्थ्यांना कौशल्य अभ्यासक्रम शिकवत असताना वैयक्तिक मलाही खूप काही शिकायला मिळाले. आम्हाला वेळोवेळी मिळालेली प्रशिक्षणे आमच्या जीवनाचे जणू शिल्पकार ठरत गेले. प्रत्येक प्रशिक्षणामध्ये नवीन शिकायला मिळालं जे मला स्वतच्या पायावर उभे राहण्यासाठी उपयुक्त ठरल. दरवर्षी पुणे येथे होणाऱ्या वार्षिक कार्यशाळेमध्ये निदेशकांमध्ये उद्योजकता वाढीस लागावी या उद्देशाने वविध ठिकाणी क्षेत्र भेटी आयोजित होत असतात. यामध्ये कोरोनापुर्वी आम्ही अशाच एका कार्यशाळेच्या निमित्ताने पुणे येथील कात्रज डेअरी आणि अभिनव फार्मिंग चे श्री. ज्ञानेश्वर बोडके यांच्या फार्मला भेट दिली होती. यानिमित्ताने अनेक उपक्रम आम्हाला जवळून पाहता आले. त्याचवेळी डोक्यात आपणही काहीतरी छोटा मोठा उद्योग करावा ही कल्पना आली. मी ग्रामीण भागात राहते. एखादा व्यवसाय सुरु करायचा ठरवलं तर सर्वात आधी मार्केटिंगचा प्रश्न येतो. या सगळ्यांचा विचार करून २०२१ च्या लॉकडाऊन काळात घरातून आईस केकचा व्यवसाय चालू करायचा ठरविले.

लॉकडाऊन असल्यामुळे या विषयाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळणे शक्य नव्हते. मग अशा वेळी प्रशिक्षण कार्यक्रमात शिकलेली माहिती तसेच You Tube च्या सहाय्याने गीतांजली यांनी इतर माहिती जमा केली. काही तज्ञ मंडळी कडून फोनवर मार्गदर्शन घेतले. हा व्यवसाय करत असताना सुरुवातीला त्यांनी अगदी थोड्या भांडवल आणि साहित्यावर केक बनवायला सुरुवात केली.

सुरुवात करताना ५००० रुपयात त्यांनी हा व्यवसाय चालू केला. घरचा फ्रीज असल्यामुळे त्यांना नवीन फ्रीज खरेदी करावा लागला नाही. पुढे या व्यवसायात जसजसे केकची विक्री होत गेली तस तस केक बनवण्यासाठी अत्यावश्यक साहित्य गीतांजली यांनी खरेदी केले. यामध्ये टर्निंग टेबल, बिटर, केकच्या वेगवेगळया आकाराचे टीन (चौकोनी, हार्ट शेप इत्यादी), डॉल केक टीन, नोझल, चॉकलेट मोल्ड, काचेचा बाउल, कढई इत्यादी साहित्य विकत घेतले.

हा व्यवसाय सुरु करण्यामागे तुमच्या प्रेरणा कोणत्या होत्या याबद्दल बोलताना गीतांजली यांनी सांगितले कि, हा व्यवसाय चालू करण्याचा




मुख्य उद्देश म्हणजे मी शाळेमध्ये ज्या मुलांना व्यवसाय शिक्षण शिकवते त्यां विद्यार्थ्यांनी हा व्यवसाय पाहून स्वत सुद्धा काहीतरी व्यवसाय सुरु करावा. जेणेकरून आता जी बेरोजगारी वाढत चालली आहे ती थोडीफार कमी होण्यास मदत होईल व गावातच नवीन रोजगार उपलब्ध करून घेण्यात ते सक्षम होतील. सध्या माझ्या या घरगुती शॉप मध्ये चॉकलेट, पायनापल, मॅंगो, बटर स्कॉच, व्हॅनीला आदी ८ ते ९ प्रकारचे केक बनविले जातात. केकवरील सजावटीही खूप उत्कृष्ट पद्धतीने करता येते . ग्राहकांच्या मागणीप्रमाणे बार्बी डॉल, मिकी माउस, डोरेमोन, आदींच्या आकारातील हे केक अत्यंत आकर्षक दिसतात. खूप अडचणी येत होत्या पण त्या अडचणीवर मात करत पुढे चालत राहिले. या व्यवसायामध्ये स्वतला गुंतवून ठेवले यातून एकप्रकारे आर्थिक मदत पण झाली.

२८, ऑक्टोबर, २०२० ला गीतांजली यांनी व्यावसायिक स्तरावर पहिला केक विक्री केला. आज अखेर ५०० पेक्षा अधिक केकची ऑर्डर आणि विक्री त्यांनी आपल्या व्यवसायाद्वारे केली. ५००० रु गुंतवणूक करून सुरु केलेल्या व्यवसायाने आजघडीला दोन लाखांचा टर्न ओवर केला आहे. याकाळात निदेशक असताना विविध प्रशिक्षण आणि माहितीच्याद्वारे आपणही व्यवसाय कारू शकतो हा आत्मविश्वास मिळाला. आता खूप आनंद होतो आहे, काहीतरी व्यवसाय सुरू करण्याची माझी इच्छा होती ती मी पूर्ण करू शकले. उन्हात चालताना सावलीची गरज असते. अंधारात चालताना प्रकाशाची गरज असते. त्या प्रमाणेच जीवनात चालताना मार्गदर्शनाची गरज असते आणि लाही संस्थेच्या संचालिका आदरणीय सुंदा ताईकडून मला खूप मोलाचे मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाली. मी आज माझ्या शाळेतील मुलांना आणि नीदेशक वर्गाला अभिमानाने सांगू शकते कि तुम्ही सुद्धा इच्छा आणि योग्य मार्गदर्शन असेल तर नक्कीच उद्योजक बनून आत्मनिर्भर होऊ शकता.

# सहज, सोपे गणित अध्यापन प्रकल्प

गणित विषयाचे महत्त्व सर्वमान्य आहे. गणित विषयामुळे माणूस तर्कशुद्ध विचार करायला शिकतो तसेच समाजाच्या भौतिक प्रगतीचा गणित हा पाया मनाला जातो. पण गणित हे तेवढेच क्लिष्ट समजले जाते. गणित विषय मुलांपर्यंत सहज सोप्या पद्धतीने पोहचावा यासाठी सन २०१५ पासून लेंड अ हँड इंडिया ने गणित शिक्षकांसाठी सहज सोपे गणित अध्यापन' हा उपक्रम हाती घेतला.

गणित विषयात विद्यार्थ्यांची आवड वाढविणे, त्यांची गणित विषयातील कामगिरी सुधारणे व त्या अनुषंगाने गणित शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करणे. तसेच निवडक गणि त शिक्षकांना फेलोशिप देऊन गणित विषया संबंधित निरनि राळ्या प्रयोगांना प्रोत्साहन देणअसा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थ्यांना वाटणाऱ्या गणित विषयाच्या भीतीचे कारण हे गणित विषयाच्या अध्यापनातही लपलेले असते. शिक्षकांचेगणिताचे अध्यापन आनंददायी, अर्थपूर्ण आणि विद्यार्थ्यांच्या विषय समजून घेण्याच्या पद्धतीला अनुकूल असणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांचे शिकणे आणि शिक्षकांचे शिकविणे या दोन्हींचा मेळ सांभाळत शिक्षणाची प्रक्रिया गतिमान ठेवावी लागते व त्यासाठी शिक्षकांना सतत प्रेरित ठेवणे हे शिक्षण, प्रशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य ठरते.

२०१५-१६ शालेय वर्षापासून लेंड अ हँड इंडिया ने सातारा व पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पाच शाळातील गणित शिक्षकांसाठी दीड ते दोन महिन्याच्या अंतराने प्रत्येकी ६ - ७ कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. अंदाजे २०० शिक्षकांनी त्यांचा लाभ घेतला. या शिवाय, विशेष विषयांवर अनेक एक दिवसाच्या कार्यशाळाही पुण्यात घेतल्या गेल्या. पुणे व जवळच्या परिसरातील अनेक शिक्षकांनी त्याचा लाभ घेतला. या शिवाय गणित विषयक newsletter, ब्लॉग माध्यमातून सतत शिक्षकांशी संपर्क ठेवणे व गणित विषयावर चर्चा घडवून आणणे असा प्रयत्नही सुरु आहे.

२०२० मध्ये लेंड अ हँड इंडिया संचालित 'सहज सोपे गणित अध्यापन' हा प्रकल्प एका नवीन वळणावर पोहोचला. प्रकल्पांतर्गत कोविड महामारी परिस्थिती लक्षात घेवून ऑनलाईन पद्धतीने मूलभूत गणित सत्र मालिकेचे आयोजन September 2020 ते August 2021 च्या दरम्यान करण्यात आले. नवीन शिक्षक, स्वत:हून या प्रकल्पाशी जोडले गेले. बीजगणित, अंकगणित, भूमिती ह्या विषयावरील अध्यापन सर्वार्थाने सहज सोपे करण्यासाठी मूलभूत संकल्पनांवर चर्चा आयोजित करण्यात आली .

9 वी व 10 वीच्या शिक्षकांबरोबरील चर्चेतून त्यांची एक समस्या नेहमी पुढे येते, विद्यार्थी 9 वी मध्ये जेव्हा प्रवेश करतात तेव्हा बरेचसे विद्यार्थी गणितात खूपच कच्चे असतात. त्यामुळे आम्हाला त्यांना आधी ८ वी पर्यंतच्या गणितात तयार करावे लागते व नंतर ९ वी चा अभ्यासक्रम सुरु करावा लागतो. साहजिकच त्यामुळे वेळ कमी पडतो, नीट शिकवता येत नाही, व विद्यार्थी नापास होतात. ह्यावर उपाय काय? तर गणितातल्या मूलभूत संकल्पनांचा एक शॉर्ट कोर्स 9 वीच्या मुलांसाठी विकसित करायचा की ज्यामुळे कमी कालावधीत मूलभूत संकल्पनाची पायाभरणी होईल. असा कोर्स विकसित करण्यासाठी विशिष्ट संकल्पना मुलांना सोप्या पद्धतीने पुन्हा कशा समजावून सांगाव्या? त्यासाठी काही विशिष्ट कृती मुलांकडून करवून घेता येतील का? मुलांच्या आकलनाचे मोजमाप कसे करावे? हे सर्व प्रश्न हाताशी धरून मुलभूत गणित सत्र मालिका सप्टेंबर 2020 ते ऑगस्ट 2021 च्या दरम्यान करण्यात आली. नुकतीच ही सर्व सत्रे सहभागी न होऊ शकलेल्या शिक्षकांसाठी YouTube वर उपलब्ध केली आहेत.

या सत्र मालिकेनंतर, या प्रयोगाचा पुढील टप्पा म्हणून इच्छुक शिक्षकांसाठी Impact Analysis अभ्यास करणार आहोत. यामुळे या प्रयोगाचा काय व कसा उपयोग झाला हे कळू शकेल. सत्रामध्ये योजिलेले मार्ग अवलंबून शिक्षक 8-9 वी चा शालेय वर्षाच्या सुरुवातीला एक महिन्याचा कोर्स घेतील. विद्यार्थ्यांमध्ये घडवून आलेल्या सुधारणा पडताळतील. सर्व शिक्षकांच्या अनुभवांचे एकत्रितरित्या विश्लेषण केले जाईल.

**प्लॅन 100, स्वाधीन प्रकल्पातील शाळांमधील गणिताचे शिक्षक देखील शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला अथवा सुट्ट्यांमध्ये 1 महिन्याचा हा कोर्स 9 वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबवू शकतात. कोर्स राबवून मूलभूत संकल्पना पक्क्या झाल्यानंतर 9 वी च्या अभ्यासक्रमास सुरुवात करता येईल. यामुळे 9 वी च्या अभ्यासक्रमातील संकल्पनांचे आकलन सोपे होईल. YouTube वर उपलब्ध सत्रांचा वापर शिक्षक, विद्यार्थी करू शकतात. शाळेच्या मुख्याध्यापकांनी व गणित शिक्षकांना यात पुढाकार घ्यावा असे आवाहन आहे.**

अधिक महिती साठी संपर्क:

asawari.vairagkar@lend-a-hand-india.org

उपयोगी Blog लिंक:

:https://sahajsopeganitlahi.blogspot.com/

# ‘कारिगर’ - कौशल्य प्रशिक्षण केंद्र : ओळख ऑटोमोबाईल लॅबची

मागील महिण्यापासून आपण कारिगर प्रशिक्षण केंद्रातील विविध लॅब (कार्यशाळा) बद्दल महिती घेत आहोत. या महिन्याच्या अंकात आपण ऑटोमोबाईल लॅब बद्दल सविस्तर जाणून घेऊया. लेंड अ हँड इंडियाने सुरु केलेल्या कारिगर प्रशिक्षण केंद्रात वेगवेगळया व्यावसायिक विषयाचे कोर्सेस घेतले जातात. यामध्ये इंजिनियरिंग, नर्सरी, गार्डनिंग, इलेक्ट्रीकल, फूड प्रोसेसिंग आणि बेकिंग इत्यादि कोर्सचा समावेश आहे. आपण आज ऑटोमोबाईल लॅब विषयी माहिती पाहूयात.

ऑटोमोबाईल लॅब हि अभियांत्रिकी कार्यशाळेमध्ये विभागलेली आहे. त्यामध्ये दुचाकी दुरुस्ती प्रशिक्षण शिकवले जाते.






ऑटोमोबाईल लॅब

दुचाकीची दुरुस्ती कशा प्रकारे केली जाते तसेच मूलभूत दुचाकीचे काम कसे चालते आणि ते दुरुस्त कसे करावे हे या अभ्यासक्रमात शिकवले जातात. प्रशिक्षणार्थी स्वतः अथवा ग्रुप मध्ये प्रात्यक्षिक करत असताना प्रत्येक उपकरण आणि दुचाकीचे विविध पार्ट प्रत्यक्ष तपासून पाहू शकतात. प्रत्येक पार्टचं कार्य काय आहे हे सहज समजावून घेऊ शकतात. अशाप्रकारे प्रत्येक प्रशिक्षणार्थी हाताने काम करत उत्तम पद्धतीने प्रात्यक्षिक करून कौशल्य प्राप्त करू शकतात.

ऑटोमोबाईल लॅबमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे दुचाकी दुरुस्ती प्रशिक्षण शिकविले जातात. त्यामध्ये इंजिन सेवा(servicing), टायर बदलणे, ब्रेक सर्व्हिसिंग, क्लच केबल सेटिंग, ब्रेक सेटिंग, ब्रेक केबल सेटिंग, फॉल्ट फाइंडिंग, एअर फिल्टर तपासणी, इंजिन ऑइल चेकिंग आणि रिप्लेसिंग, स्पार्क प्लग गॅप सेटिंग, स्पार्क प्लग साफ करणे, स्पार्क प्लग काढून टाकणे आणि रिफिटिंग इ. प्रकारचे प्रॅक्टिकल शिकविली जातात.

या कारिगर प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थी, शाळेतील ड्रॉपआउट मुल, शाळाबाह्य युवक-युवती प्रशिक्षण घेत आहेत. याशिवाय आधी व्यवसाय प्रशिक्षण घेऊन पुढे ज्या युवक युवतींना उद्योजक व्हायचे आहे असे प्रशिक्षणार्थी देखील पुढील मार्गदर्शनाकरिता कारिगर येथे येतात. मुलभूत ते अत्याधुनिक प्रशिक्षण, मार्गदर्शन याशिवाय प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र, soft skills, संगणक कौशल्ये इत्यादि प्रकारची सुविधा लेंड अ हँड इंडियाने कारिगर प्रशिक्षण केंद्रामध्ये तयार केली आहे. या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अत्याधुनिक सोयी सुविधा असलेल्या लॅब मध्ये लेंड अ हँड इंडियाच्या अंतर्गत ज्या शाळांमध्ये मल्टी स्कील हा विषय शिकवला जातो त्या शाळांच्या शिक्षकांचे प्रशिक्षण देखील या ठीकाणी घेतले जाते. अनेक विद्यार्थ्यांनी आणि प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षण केंद्रात अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांच्या पुढील करीअरला सुरुवात केली आहे.



ऑटोमोबाईल लॅब

# आगामी वार्ता

Lend A Hand India

- दिल्ली राज्य अनेक आदर्श शाळा सुरु करत आहे. याला अनुसरून **दिल्ली शासनाचे प्रतिनिधी लवकरच लेंड अ हँड इंडिया कार्यालय आणि कारिगर प्रशिक्षण केंद्राला भेट देणार आहेत.** या भेटीद्वारे हे प्रतिनिधी संस्थेची आणि कारिगर येथील प्रशिक्षण सुविधेची ओळख करून घेतील.
- **लेंड अ हँड इंडिया शिष्यवृत्ती बाबतची अंतिम यादी लवकरच सर्व शाळांपर्यंत पोहचवली जाईल.** बऱ्याचशा शाळा अजूनही बंद असल्याने आम्ही प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला ऑनलाईन फॉर्म पाठवलेला आहे आणि या सर्व प्रक्रियेत शाळेला सहभागी करून घेतले गेले आहे. सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि निदेशकांना विनंती आहे की विद्यार्थ्यांना ही माहिती कळवा आणि आवश्यकतेनुसार त्यांना मदत करा.
- लेंड अ हँड इंडियाद्वारे थेट राबविल्या जाणाऱ्या **सर्व प्रकल्प शाळांमधील निदेशकांसाठी सहा सप्टेंबर २०२१ रोजी ऑनलाईन शिक्षक दिन साजरा केला जाईल.**
- मागील महिन्यात पुढाकार घेऊन औंध शाळेने शिक्षकांसाठी **'ऑनलाईन प्रशिक्षण तंत्र' या विषयावर आयोजित केलेल्या प्रशिक्षणाची इतर शाळांकडून मागणी होत आहे.** या प्रशिक्षणाच्या अनुभवानंतर आणखी शाळांनी त्यांच्या शिक्षकांसाठी असेच प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी लेंड अ हँड इंडिया कडे संपर्क साधला आहे. **ही प्रशिक्षणे सप्टेंबर महिन्यात आयोजित केली जातील.**

# लेंड अ हँड इंडिया अपडेट्स

- **गणित शिक्षकांसाठी सत्रांचे आयोजन :**

महाराष्ट्रातील गणिताच्या शिक्षकांसाठी अंकगणित, बीजगणित आणि भूमिती विषयातील संकल्पनांचा समावेश असलेल्या '९वी-पूर्व तयारी कोर्स' या उपक्रमांतर्गत २४ सत्रांची ऑनलाईन मालिका नुकतीच पुर्ण करण्यात आली. सहज सोप गणित उपक्रमाचा एक भाग म्हणून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतील 50 हून अधिक शिक्षकांनी ही सत्र मालिका पूर्ण केली. या अंकातील सहज सोपे गणित या स्वतंत्र लेखात नमूद केल्याप्रमाणे, आता लाही सप्टेंबर - ऑक्टोबर 2021 मध्ये या प्रकल्पाचा प्रभाव अभ्यास (impact study ) करणार आहे.

- **लेंड अ हँड इंडिया आंतरराष्ट्रीय पातळीवर:**

तुम्हाला माहित आहेच की देशभरात समग्र शिक्षणाच्या सहकार्याने २४ राज्य आणि 10,000 पेक्षा जास्त शाळांमध्ये लेंड अ हँड इंडिया कार्यरत आहे आणि. यापुढे जाऊन आता लेंड अ हँड इंडिया पूर्व आफ्रिकेतील 'रवांडा' या देशातील माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या व्यावसायिक शिक्षणात सहकार्य करणार आहे.लाही प्रकल्पाला तांत्रिक आणि व्होकेशनल एज्युकेशन ट्रेनिंगच्या (TVET ) माध्यमातून मदत करणार असून याशिवाय प्रकल्पाला तांत्रिक सहाय्य आणि प्रकल्प नियोजन देखील करणार आहे.

- **करोना १९ मदतकार्य:**

कोरोना परिस्थितीमुळे गंभीर परिणाम भोगावे लागलेल्या बीड जिल्ह्यातील पंचवीस गावातील सुमारे तीन हजार कुटुंबियांना नवचेतना या स्थानिक सामजिक संस्थेच्या सहकाऱ्याने रेशन कीट व स्वच्छता कीट चे वाटप करण्यात आल.



# कारीगर प्रशिक्षण केंद्र अपडेट्स

कारीगर प्रशिक्षण केंद्र पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झाले असून सध्या या प्रशिक्षण केंद्रात अनेक कौशल्य अभ्यासक्रम आणि विविध प्रशिक्षण सुरु झाले आहेत. या सदरातून आम्ही दर महिन्याला कारीगर प्रशिक्षण केंद्र येथे सुरु असलेले अभ्यासक्रम, प्रशिक्षण आणि उपक्रमांबद्दल माहिती आपल्यापर्यंत पोहचवत राहू.

- **बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी Supplementary Batch**

कोविड काळात शाळा बंद असल्याने सर्व शाळा या ऑनलाईन पद्धतीने सुरु होत्या. या काळात कौशल्य अभ्यासक्रमांतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करण्यात अनेक अडथळे येत होते. विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक अपूर्ण राहू नयेत तसेच त्यांना हाताने प्रत्यक्ष काम करत



कौशल्ये आत्मसात करता यावी याकरिता पुणे शहरातील मनपा शाळांमधील व्यवसाय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कारीगर केंद्र येथे प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करून कौशल्य शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. या अंतर्गत इयत्ता बारावीत असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी अपापल्या विषयाशी निगडीत कार्यशाळेत short term अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत.

- **Trending Cake making Workshop**

ऑगस्ट महिन्यात चार बॅचच्या माध्यमातून जवळपास २० लोकांनी हा **Trending Cake making Workshop** पुर्ण केला आहे. या कार्यशाळेत सध्या बाजारात जास्त प्रसिद्ध असणारे, सर्वाधिक मागणी असणाऱ्या केक पाककृती शिकविल्या जातात. या प्रशिक्षणात सहभागी होणारे प्रशिक्षणार्थी स्वत: घरी अथवा दुकानाच्या माध्यमातून आपला छोटा केक विक्रीचा व्यवसाय करू शकतील.

- **Short Term Course: विषय इलेक्ट्रिकल**


इतर अभ्यासक्रमांप्रमाणेच कारीगर प्रशिक्षण केंद्रात इलेक्ट्रिकल विषयाचे देखील प्रशिक्षण दिले जाते. मागील महिन्यात संपन्न झालेल्या short term इलेक्ट्रिकल बॅचद्वारे सहा विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पुर्ण केला आहे. या अभ्यासक्रमाद्वारे हे विद्यार्थी घरगुती उपकरण दुरुस्ती आणि मूलभूत वायरिंग प्रक्रिया यावर काम करू शकतील तसेच



इलेक्ट्रिकल व्यवसायाशी निगडीत उद्योग मध्ये नोकरी देखील करू शकतील.

- **सिक्कीम येथील निदेशकांचे प्रशिक्षण**

सिक्कीम राज्यातील प्रोजेक्ट कॅटॅलिस्ट अंतर्गत काम करणाऱ्या ३० निदेशकांचे ऑनलाईन प्रशिक्षण ऑगस्ट महिन्यात कारीगर प्रशिक्षण केंद्र येथे पार पडले. या प्रशिक्षणात मल्टी स्किल फौंडेशन कोर्स या अभ्यासक्रमातील चारही विषयांशी निगडीत सर्व प्रात्यक्षिके तसेच लेसन प्लानिंग, ऑनलाईन टीचिंग टूल्स याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



## बहुविध कौशल्य अभ्यासक्रम: उच्च शिक्षणाकरता क्षेत्र निवडताना व उच्च शिक्षण घेताना होणारा उपयोग

**(सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये बहुविध कौशल्य अभ्यासक्रम घेऊन इ. १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास)**

**पार्श्वभूमी:**

गेल्या अनेक वर्षांपासून, लेंड अ हेंड इंडियाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील शाळांमध्ये सुरु झालेला Introduction to basic technology (आय.बी.टी.) चा प्रवास आता भारतातील अनेक राज्यातील शाळांमध्ये बहुविध कौशल्य अभ्यासक्रम (एम.एफ.एस.सी) या नावाने सुरु झाला आहे. सदर अभ्यासक्रमाचा उपयोग हा विषय घेऊन इ. १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याकरता क्षेत्र निवडताना व प्रत्यक्ष उच्च शिक्षण घेत असताना, किती व कसा होतोय हे बघण्यासाठी लेंड अ हेंड इंडियाने एक अभ्यास केला. सन २०११-१२ आणि २०१२-१३ या वर्षी बहुविध कौशल्य अभ्यासक्रम हा विषय घेऊन उत्तीर्ण होणारी अनुक्रमे ५ वी व ६ वी बॅच आहे. १५ व्या वर्षी या बॅच मधील विद्यार्थी १० वी पास झाला असे गृहीत धरल्यास, अंदाजे या बॅच मधील विद्यार्थ्यांचा सध्या वयोगट २० ते २१ असू शकेल. सर्वसाधारणपणे अशा विद्यार्थ्यांचे पदवी, डिप्लोमा, आय.टी.आय. अशा प्रकारचे शिक्षण होऊन ते कामाला लागले असण्याची शक्यता असेल असे गृहीत धरून या बॅचची निवड अभ्यासाकरिता केली गेली. सदर अभ्यास हा सन २०१४-१५, २०१७-१८ आणि २०२०-२१ या तीन वर्षात केला गेला.

पहिल्या अभ्यासामध्ये विद्यार्थ्यांची उच्च शिक्षण घेण्यामधली सातत्यता आणि क्षेत्र निवडताना या कौशल्य अभ्यासक्रमाचा उपयोग होतो आहे असे दिसून आले. त्यामुळे पुन्हा २०१७-१८ मध्य दुसरा अभ्यास केला गेला. दुसऱ्या वर्षीदेखील पुढील शिक्षण घेण्यामधली सातत्यता व तांत्रिक विषय निवडण्याची आवड विद्यार्थ्यामध्ये दिसून आली. त्यामुळे खरेच विद्यार्थी शिक्षण पूर्ण घेतात की नाही व शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढे काय करत आहेत हे बघण्यासाठी तिसऱ्या वेळी सन २०२०-२१ मध्ये अभ्यास केला गेला.

**अभ्यासाचा उद्देश, प्रकिया आणि निष्कर्ष:**


**उद्देश:**

उपरोक्त अभ्यास करण्यामागील उद्देश खालीलप्रमाणे होते.

बहुविध कौशल्य अभ्यासक्रम विषय घेऊन इ. १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी इ. १० वी नंतर पुढील शिक्षण घेण्याकरता कोणते क्षेत्र निवडतात हे बघणे.

एम.एस.एफ.सी. विषय घेऊन इ. १० वी उत्तीर्ण झालेले किती विद्यार्थी तांत्रिक विषय निवडतात हे अभ्यासणे.

उच्च शिक्षण व तांत्रिक शिक्षण घेणारे किती विद्यार्थी स्वत:च्या पायावर उभे राहून आत्मनिर्भर झाले आहेत हे अभ्यासणे. किती विद्यार्थी स्वत:चा व्यवसाय सुरु करून अथवा घरातील



**प्रातिनिधिक छायाचित्र**

व्यवसायात मदत करून आत्मनिर्भर झाले आहेत हे अभ्यासणे.

**प्रक्रिया:**

निवडलेल्या शाळा या महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यामधील विविध गावांमध्ये आहेत. त्यामुळे विद्यार्थी देखील शाळेच्या आसपास असलेल्या गावांमधील होती. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचणे शक्य नसल्यामुळे विद्यार्थ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला गेला व माहिती घेतली गेली. सदर माहिती गोळा करण्याकरता तीनही वर्ष प्रश्नावली तयार केली गेली व त्याचाच वापर माहिती गोळा करण्याकरता केला गेला. सदर माहितीचे विश्लेषण केल्यानंतर अहवाल तयार केला गेला.

**निष्कर्ष:**

२०११-१२ व २०१२-१३ मधील इ. १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसोबत तीनही अभ्यासातील निष्कर्ष खालीलप्रमाणे:

बहुविध कौशल्य अभ्यासक्रम हा कौशल्य आधारित अभ्यासक्रम त्याच्या सुरु करण्यामागच्या उद्धेशांकडे जातो आहे. शाळेमध्ये घेतल्या गेलेल्या विविध तांत्रिक विषयातील प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून घेतलेल्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक विषयात आवड निर्माण झाली आहे व त्यामुळेच बरेचसे विद्यार्थी हे तांत्रिक शिक्षण जसे की अभियांत्रिकी, आय.टी.आय., पोलीटेक्निक आणि बायो-फोकल इ. क्षेत्र निवडत असल्याचे दिसून आले. ग्रामीण भागात शिक्षणाविषयी जागृती झाल्याचे दिसून आले. २०११-१२ मध्ये इ १० वी पास झालेल्या व ३ ऱ्या सर्वेक्षण करते वेळी संपर्क केलेल्या एकूण २२९ विद्यार्थ्यांपैकी ६७% विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्याचे व काही विद्यार्थी पुढील उच्च शिक्षण घेत असल्याचे दिसून आले. तर २०१२-१३ मधील इ. १० वी पास झालेल्या व ३ऱ्या सर्वेक्षनावेळी संपर्क केलेल्या एकूण ८२ विद्यार्थ्यांपैकी ६३% विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्याचे नोंदवले.

## विशेष लेख : पान दहा वरून  पुढे

उच्च शिक्षण घेतलेले विद्यार्थी आत्मनिर्भर झालेले दिसून आले. उच्च शिक्षण घेतलेले विद्यार्थी नोकरी करत आहेत किंवा स्वत:चा व्यवसाय सुरु केला असल्याचे दिसून आले. २०११-१२ मधील सर्वेक्षण केलेल्या व शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यापैकी ३३.१८% विद्यार्थी नोकरी अथवा स्वत:चा व्यवसाय करत आहेत व महिन्याला रु. १०,००० ते १५,००० उत्पन्न मिळवत आहेत. तर सन २०१२ मधील सर्वेक्षणातील शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यापैकी ४०.३८% विद्यार्थी नोकरी अथवा स्वत:चा व्यवसाय करून महिन्याला ८,००० ते १५,००० पर्यंत उत्पन्न घेत आहेत.

या अभ्यासातून असेही दिसून आले की, विद्यार्थ्यांमध्ये शाळेमध्ये सलग तीन वर्षे (इ. ८ वी, ९ वी व १० वी) घेतलेल्या तांत्रिक विषयातील कौशल्यामुळे त्यांच्या अंगातील कौशल्य अधिक विकसित झाल्याचे दिसून आले. तसेच उच्च शिक्षण घेण्याकरता योग्य क्षेत्र निवडी साठी देखील मदत झाली असे विद्यार्थ्यांनी सांगितले. २०११-१२ मधील ६७% विद्यार्थ्यापैकी २७% विद्यार्थी हे तांत्रिक शिक्षण घेतलेले दिसले तर २०१२-१३ मधील ६३% विद्यार्थ्यापैकी ४८.०८% विद्यार्थ्यांनी तांत्रिक शिक्षणाची निवड केल्याचे दिसून आले. हे प्रमाण राज्य व देश पातळीवरील सरासरीपेक्षा अनेक पटीने जास्त आहे.

२०१२-१३ मधील अधिक विद्यार्थ्यांनी तांत्रिक शिक्षण घेण्यामागील कारण हे विद्यार्थ्यामध्ये तांत्रिक विषयाची अधिक माहिती, ते पूर्ण केल्यावर निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या अधिक संधी, मोठी भावंडे व इतर मित्र-मैत्रिणीकडून मिळालेली तांत्रिक शिक्षणाबद्दलची माहिती, व शाळेतील बहुविध कौशल्य अभ्यासक्रम उपक्रमामुळे निर्माण झालेली आवड ही कारणे असल्याचे विद्यार्थ्यांनी नोंदवले.

२०११-१२ मधील ३३% व २०१२-१३ मधील ३४% विद्यार्थ्यांनी इ. १२ वी नंतर शिक्षण सोडल्याचे दिसले. यामध्ये विद्यार्थिनींचे प्रमाण जास्त दिसले. यामागची कारणे लवकर झालेली लग्न, महाविद्यालय घरापासून दूर असणे इ. आहेत. बरेचदा पालक मुलींना शिक्षणाकरता गावाबाहेर जाऊ देण्यास नकार देत असल्याचे दिसून आले. तसेच विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे मिळेल ते काम अथवा शेती करत असल्या कारणाने शिक्षण घेऊ शकले नाही असे आढळून आले.

खालील तक्त्यामध्ये बहुविध कौशल्य अभ्यासक्रमामधील चार विभागांची विविध तांत्रिक क्षेत्राशी जोड कशी आहे हे दाखवण्यात आली आहे.

उपरोक्त दोन्ही अभ्यास विषयाचे अहवाल मागणी केल्यास पाठवले जातील.

| तांत्रिक क्षेत्र | एम.एस.एफ.सी. अभ्यासक्रमाशी असलेली जोड |
|---|---|
| विविध अभियांत्रिकी पदवी/पदविका<br>(बांधकाम, विद्युत, संगणक, यांत्रिक इ.) | १) कार्यशाळा व अभियांत्रिकी तंत्रज्ञान<br>२) ऊर्जा व पर्यावरण |
| तंत्रज्ञान पदवी | १) कार्यशाळा व अभियांत्रिकी तंत्रज्ञान |
| विविध डिप्लोमा<br>(बांधकाम, विद्युत, संगणक, यांत्रिक इ.) | १) कार्यशाळा व अभियांत्रिकी तंत्रज्ञान<br>२) ऊर्जा व पर्यावरण |
| आय.टी.आय. | १) कार्यशाळा व अभियांत्रिकी तंत्रज्ञान |
| व्यवसाय प्रशासन पदवी (Business Administration) | १) कार्यशाळा व अभियांत्रिकी तंत्रज्ञान<br>२) खाद्य पदार्थ तंत्रज्ञान (मार्केटिंग, लेबलिंग इ.) |
| शेती पदवी/पदविका | १) शेती व पशुपालन |

Lend A Hand India

**लेंड अ हँड इंडिया**

9 , जीवन विहार हौसिंग सोसायटी ,
प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग,
४११०१६ , फोन : (०२०) २५६३ ००९२.
Lahi@lend-a-hand-india.org , www.lend-a-hand-india.org